# विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन, पुणे विभाग, पुणे १

## शाखा- मागासवर्ग कक्ष (दुरध्वनी : २६३६१०३२)

क्र.मावक/वशी-/ ७७ /२०१७ दिनांक: १४/०७/२०१७

प्रति,

१) मा. उपकुलसचिव, (आरक्षण कक्ष) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ / कोल्हापूर विद्यापीठ/ सोलापूर विद्यापीठ

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे / कोल्हापूर विभाग, पुणे / कोल्हापूर

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), पुणे / सातारा /सांगली /सोलापूर /कोल्हापूर

विषय : सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०१६/प्र.क्र.२२८A/१६/१६-ब दिनांक २९मे २०१७ अन्वये बिंदू नामावली नोंदवहीची पडताळणी करणे बाबत

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०१६/प्र.क्र.२२८A/१६/१६-ब दिनांक २९मे २०१७ अन्वये मागासवर्गीयांकरीता छोट्या संवर्गातील आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती बाबतचे शासन परिपत्रक दि.५/११/२००९ सोबत जोडलेल्या छोट्या संवर्गातील पदे भरण्यासंदर्भातील प्रपत्र ब व क रद्द करुन या शासन परिपत्रकान्वये सुधारित कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

त्यानुसार संबंधित मान्यता प्राधिकारी यांनी व नियुक्ती प्राधिकारी यांनी सदर शासन परिपत्रकाचे स्वत: अवलोकन करुन त्यानुसार त्यांचे अखत्यारितील छोटे संवर्गातील बिंदू नामावलीची प्राथमिक तपासणी करणे आवश्यक आहे. सदरील तपासणी सुलभ व अचूक होणेसाठी या कार्यालयाकडून प्रपत्र-इ तयार करणेत आले आहे. सदर प्रपत्र-इ मध्ये तपशिलवार माहिती भरुन ती नियुक्ती प्राधिकारी व मान्यता प्राधिकारी यांनी साक्षांकीत करुन त्याअनुषंगाने प्राथमिक तपासणी करणे आवश्यक आहे.

सबब या कार्यालयास बिंदू नामावली अंतिम तपासणीस पाठविताना शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०१६/प्र.क्र.२२८A/१६/१६-ब दिनांक २९मे २०१७ अन्वये रोष्टरची तपासणी करुन सदरचे साक्षांकीत प्रपत्र-इ सहीत रोष्टर पाठवावे, जेणेकरुन संबंधित कार्यालयाच्या रोष्टरची पडताळणी करणे सोईचे होईल.

स्नेहा किसवे-देवकाते<br>सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष )<br>पुणे विभाग पुणे

सोबत: प्रपत्र-इ

D/Ayukt Katryalay/General/Letter 12-7-16

True Copy

टीप—सदरील बिंदू नामावलीबाबतची माहिती नियुक्ती प्राधिकारी व मान्यता प्राधिकारी यांनी स्वत:तपासून भरावयाची आहे.

प्रपत्र – इ

संवर्गनिहाय वेगवेगळी यादी सादर करावी.

सरळसेवा २–३३ व पदोन्नतीसाठी २–३२ मंजूर पदाच्या देय आवश्यक आरक्षणापैकी देय अंतिम मागास प्रवर्गाबाबतची माहिती

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | मंजूर पदसंख्या | देय आरक्षणापैकी देय अंतिम मागास प्रवर्गाचे नांव | स्तंभ ४ मधील मागास प्रवर्गाचा बिंदू रिक्त आहे काय? | | बिंदू क्रमांक (स्तंभ ५ अ व ब बाबत संक्षिप्त माहिती) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | | | | | | | |
| | | | | | | ५ अ लागू असल्यास (बिंदू रिक्त असल्यास) | | | | | ५ ब लागू असल्यास | | |
| | | | | होय (अ) | नाही (ब) | अ | ब | क | ड | इ | अ | ब | क |
| | | | | | | बिंदू क्र | कधीपासून रिक्त | बिंदू रिक्त राहण्याचे कारण? | सदरील रिक्त पद भरणेसाठी किती भरती वर्षे पर्यत प्रयत्न केले (जाहिरातीसह)नियुक्ती प्राधिकारी | सदरील बिंदू रिक्त होणेपूर्वी कोणकोणत्या मागास प्रवर्गासाठी वापरला गेला | कर्मचा–याचे नांव | निवड जात प्रवर्ग | सेवा निवृत्तीने पद रिक्त होणेचा दिनांक |
| | | | | | | | | | | | | | |

सदर प्रपत्रात नमूद केलेली बिंदू नामावली संदर्भातील सर्व माहिती पूर्णपणे सत्य व खरी असुन दिलेली माहिती चुकीची अथवा खोटी असलेस महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जमाती) भटक्या जमाती ,विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१ मधील कलम ८ नुसार शिक्षेची तरतुद आहे. याची मला पुर्णपणे जाणीव आहे.

ठिकाण –

दिनांक –